MAHATMA PHULE MAHAVIDYALAYA PIMPRI, PUNE-17



# INDEX

01) ANALYSIS ON SELF CONFIDENCE AND PHYSICAL FITNESS AMONG....
**Prof. Dr. Dnyaneshwar V. Thakre, Armori, Dist. Gadchiroli** ||10

02) Bhakti movement in Indian knowledge system
**Dr. Vivek Pathak, Moradabad** ||14

03) AN EMPIRICAL EVALUATION OF STUDENTS' PERSPECTIVES OF USING....
**DR. V. LAKSHMIPATHY, Dr. V. VICTOR SOLOMON, Chennai** ||18

04) Challenges in Modern Naval Security: Assessing the Threat....
**Sourabh Dattatry Dhamankar, Arjapur, Dist - Nanded** ||21

05) A WOMAN'S PSYCHOSOCIAL VOICE IN THE POETRY OF SYLVIA....
**S.G. Dhanalakshmi Devi** ||25

06) Abhinaya : An Artistic Approach of Communication
**Dr. Layleena Bhat, Varanasi** ||28

07) Gandhian Concept of Ethics: A way to peace
**Dr. Sreenivasulu Naik, Tirupati** ||32

08) Dynamics of Food Culture in the Varanasi District of Uttar Pradesh
**Pragya Chaturvedi, Lucknow** ||37

09) Effect of working from home on female employees
**Tanuka Bhattacharya, Dr. Pritha Chaturvedi, Ranchi** ||43

10) A JOURNEY THROUGH LIBRARY AND INFORMATION SCIENCE EDUCATION....
**Ajay Kumar Yadav, Dr Sarvesh Kumar, Prayagraj, (U. P.)** ||52

11) A Thematic Study of R. K. Narayan's Novel The Guide
**Dr. Narendra Singh, Hasanpur, Amroha (U.P.)** ||57

12) DEFICIT FINANCING IN INDIA
**PHOOL CHAND MAHOLIA, KALADERA, JAIPUR** ||61

13) READINESS OF TACHER EDUCATORS FPR BLENDED MODE OF TEACHING
**Dr. Piku Chowdhury** ||64

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

MAHATMA PHULE MAHAVIDYALAYA PIMPRI, PUNE-17



14) A Study of the Contribution of Tribal Freedom Fighters....
**Dr. Ramesh Raut, Nashik** ||70

15) स्वामी विवेकानंद यांचे भारतीय स्त्रीविषयक विचार
**डॉ. सुनंदा एकनाथराव आहेर, बीड** ||75

16) प्रज्ञा सूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेतकऱ्यांविषयी विचार
**सहा. प्रा. ओंकार गणपत डोंगरे, पिंपरी, पुणे** ||77

17) आपुला ची वाद आपणांसी : कार्यकर्त्यांचे प्रांजळ मनोगत
**डॉ. उत्तरेश्वर ज्ञानोबा सुरवसे, नागपूर** ||80

18) स्मृतीक्षमता, विचार प्रक्रिया व शरीर स्थितीचा चिकित्सक अभ्यास
**प्रा. डॉ. दिनेश जारोंडे, कळंब, जि. यवतमाळ** ||84

19) मोल ळातील स्त्रियांचे स्थान
**प्रा. आर. `. सुर्यवंशी, मालोांव, जि. नाशि** ||86

20) पोषण आणि शारीरिक क्रियाकलाप
**डॉ. निरजकुमार उपलंचवार, देगलूर** ||88

21) शाहू महाराजांचा आरक्षण विषयक दृष्टीकोन
**प्रा. बोंडारे मनोजकुमार बालाजी, लोहा, जि. नांदेड** ||90

22) हिंदुस्तानी शास्त्रीय संगीतातील प्रकार - तराणा
**डॉ. जयश्री विश्राम कुळकर्णी, परतवाडा, जि. अमरावती** ||92

23) सौन्दर्यानुरागी महाकविर्माघ:
**श्रीमती राजकुमारी, भरतपुर (राज.)** ||94

24) वृद्धावस्था और प्रेमकामनाएँ
**रश्मि शर्मा, प्रो. राजेन्द्र साह, दरभंगा** ||97

25) मनरेगा योजना : उद्देश्य एवं प्रावधान एक अध्ययन
**वंदना तिवारी, नीरजा मिश्रा, जबलपुर** ||100

26) योगतत्वोपनिषद में योग की अवधारणा एवं सिद्धान्त : एक....
**डॉ. असीम कुलश्रेष्ठ, डॉ. अनुजा रावत, उत्तराखंड** ||104

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

MAHATMA PHULE MAHAVIDYALAYA * PIMPRI, PUNE-17



16

# प्रज्ञा सूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेतकऱ्यांविषयी विचार

सहा. प्रा. ओंकार गणपत डोंगरे
इतिहास विभाग
महात्मा फुले महाविद्यालय पिंपरी, पुणे

*********

**सारांश :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शेतीसाठी अधिनियम व कायदा असावा ही संकल्पना शेतकऱ्यांसाठी किती मोलाची आहे हे अधोरेखित केले होते बाबासाहेबांच्या संकल्पनेतूनच कमाल जमीन धारणा कायदा सावकारी व खोती पद्धतीने प्रतिबंध करणारा कायदा सामूहिक शेती तसेच शेती महामंडळ राज्यातील नद्या खोऱ्यांची विभागणी व विकास जलसंवर्धन योजना अंमला आल्या. शासनाने त्याबाबत कायदे व नियम बनवले यामागे बाबासाहेबांच्या विचारांचा प्रभाव दिसून येतो डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेतीबाबतचे विचारधन राज्यकर्ते नियोजनकार व शेती तज्ञांनी अभ्यासले पाहिजेत. दुर्दैवाने अनेकांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे शेतकऱ्यांचे कैवारी देखील होते हे अजूनही ठाऊक नाही.

**प्रस्तावना :**

भारतातील वर्णव्यवस्था व जातीव्यवस्थेच्या विरोधात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी उभारलेला लढा हा जगाच्या इतिहासात मानव मुक्तीचा लढा ठरला. भारतातील विषमतेच्या प्रश्नाला अनेक स्तर आहेत त्यापैकी आर्थिक विषमता हा गहन प्रश्न डॉ. बाबासाहेबांनी सखोल अभ्यासला व मांडला.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना शेतकरी प्रश्नांची चांगली जाण होती. त्यांचा शेतकऱ्यांविषयी मोठा अभ्यास होता त्यांनी शेती व शेतकऱ्यांसाठी मोठा संघर्ष केला. स्वातंत्र्यापूर्वी शेतकरी हक्कांसाठी ब्रिटिशांसोबत लढले त्यांचे शेतीविषयक विचार आजही जसेच्या तसे लागू होतात.

**शेतकऱ्यांसाठी केलेले कार्य :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर केवळ कामगारांचे किंवा अस्पृश्यांचेच लढणारे नेते होते असे नव्हे तर शेती, शेतकरी, शेतमजूर यांच्यासाठी ही लढणारे नेते होते. तत्कालीन कोकणात अस्तित्वात असलेल्या खोत पद्धतीच्या विरुद्ध सर्वप्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आवाज उठवला. खोत म्हणजे गावातला एक लहानसा राजाच असतो. खोतांद्वारे शेतकऱ्यांचे होणारे शोषण आणि गुलामी याबाबत वाचा फोडण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले होते.[1] हा एक सामाजिक जुलुम आहे हे सांगताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात खोती प्रकाराने शेतकरी सर्व बाजूंनी नाडला जातो. संपूर्ण कुटुंबास वेठीस धरण्याचं काम खोती पद्धतीत केले जाते. वेठबिगारकरिता शेतकऱ्यांचा वापर खोत करतात. शेतकऱ्यांच्या प्रगतीत खोत हा सर्वात मोठा अडसर ठरत असल्याचे स्पष्टपणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांगतात. शेतकरी ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. शेतकरी अज्ञानी असल्याने खोतांचे चांगलेच फावते. यातून शेतकरी आपले हक्क गमावून बसतो हक्कदार शेतकऱ्यांकडून जबरदस्तीने अप्रत्यक्षरीत्या छळ करून एकसाली कबुलायती खोतानी घेतल्याने शेतकरी आर्थिक विवंचनेत आणि गुलामगिरीत सापडला असल्याने यासाठी कठोर कायदा करून, कायदे कौन्सिलात खोती संदर्भात एक बिल आणण्याचा विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकर मांडतात. खोती प्रकार हा एक सामाजिक व राष्ट्रीय प्रश्न म्हणून शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायविरुद्ध बाजू मांडण्याचा प्रयत्न बाबासाहेब आंबेडकरांनी केलेला होता. त्यांनी वेळोवेळी काही गोष्टी प्रकर्षणाने इंग्रजी सरकारच्या निदर्शनास आणून दिल्या. १४ एप्रिल १९२९ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण येथे शेतकरी परिषद भरवण्यात आली. याचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. या सभेस संबोधित करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात आर्थिकदृष्ट्या खोती पद्धत कुळांना घातक आहे इतकेच नव्हे तर नैतिकदृष्ट्याही ही पद्धत विघातक असून अशा खोती पद्धतीची ही परिषद तीव्र निषेध करते व ती नाहीशी करावी अशी सरकारला खास आग्रही सूचना करते असा ठराव या परिषदेमध्ये समंत करण्यात